Golden Research Thoughts
Volume : 1 Issue : 2, August - 2011
ISSN:- 2231-5063
Available online at www.aygrt.org

ORIGINAL ARTICLE

दलित साहित्यातील सामाजिकता

प्रा.डॉ.दिपक रिटे
विज्ञान महाविद्यालय मराठी विभाग सांगोला, जि.सोलापूर

प्रस्तावना:

मराठी साहित्यात दलित साहित्याचा प्रवाह महत्त्वाचा मानला जातो, मराठी साहित्याची प्राचीन परंपरा असली तरी दलित समूहाला या साहित्यात फारसे स्थान मिळाले नाही, मराठीतील काही लेखकांचा अपवाद वगळता. मराठी साहित्य काही लोकापर्यंतच मर्यादित राहिले होते, परिणामी या साहित्यात तोच तो पणा आलेला होता, नवं काही लिहिलं जात नव्हतं, वर उल्लेख केल्याप्रमाणे श्री.म.माटे यांच्या काही कथाचां अपवाद सांगता येईल, स्वातंत्र्यपूर्व काळात दलित समूहाला, त्याच्या जगण्याला विशेष असे स्थान मराठी साहित्यांने दिले नाही, पुढच्या काळात, म्हणजे स्वातंत्र्यानंतर प्रत्येक जात, समूहाची वेगळी वैशिष्टये मराठी साहित्यात येऊ लागली. विशेषत: १९६० नंतर 'स्व' ची जाणिव प्रत्येक, समाजात आली. कारण राज्यघटनेने शिक्षणाचा हक्क सामान्यातील सामान्य माणसाला दिला. ''

आत्मकथनांचा उदय:

१९६० नंतरच्या मराठी साहित्यात दलित कविता, कथा, कादंबरी काही प्रमाणात निर्माण झाली असली तरी १९६० नंतरचा कालखंड मराठी साहित्यात विशेष महत्त्वाचा यासाठी आहे, की दलित आत्मकथांनाच्या माध्यमातून जे समाज वास्तव परंपरेला छेद देत येऊ लागले त्यामुळे एकूण शहरी जीवनाबरोबर साहित्याची निर्मिती ही वास्तव समोर ठेवून निर्माण होऊ लागली. दलित आत्मकथनाच्या माध्यमातून रुढी, परंपरा, शिवराळपणा याचं समाज प्रतिबिंब त्या लेखकांनी आपल्या अनुभवाला प्रमाण मानुन लिहिले आहे. जातीचे बंधने माणूस असूनही कमी लेखणे देव, गाव, परंपरा, बलुतेदारी याचं वास्तव मिश्रण दलित आत्मबंधनामध्ये आवेश पूर्ण नसले तरी सयंमातून सांगण्याचा प्रयत्न आणि त्यातूनही एकटा नाही तर डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या विचारातून आलेले शिकण्याचे बळ, त्यामुळे आत्मकथनातून एकटा व्यक्ती / लेखक बोलत नाही, तर त्याच्या संपूर्ण समाजाचे दु:ख वेदनेसह तो सांगत आहे. ही सामाजिक परंपरा दलित साहित्याच्या आणि व्यक्त करण्याच्या त्याच्या भूमिकेतून मराठी साहित्याला महत्त्वाची वाटते.

दलित आत्मकथनातील सामाजिकता:

दलित साहित्यामध्ये, दलित आत्मकथन हा अतिशय महत्त्वाचा वाड्:मयीन ठेवा आहे ज्या माणसाला, माणूसकीची जाणीव समाज परंपरेत होऊ दिली नाही. नेहमी उपेक्षितपणाचे जगणे ज्याच्या वाटयाला आले, माणूस असूनही माणसापासून दूर असण्याची अस्वस्थ वेदना, सामाजिक परंपरेला छेद देत आत्मकथनांनी साहित्यिक नवनिमितीचा अविष्कार घडविला आहे. दया पवारा 'बलुतं', लक्ष्मण माने 'उपरा', उत्तम तुपे 'काटयावरची पोटं', माधव कोंडविलकर, 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठण', महादेव मोरे 'गबाळ', लक्ष्मण गायकवाड याचं 'उचल्या' आणि बरीच आत्मकथना संबंधी सांगता येईल, सामाजिकता या अर्थाने स्पष्ट केली की, समाज प्रवाहात आमचे स्थान काय ? आणि आम्हाला माणूस म्हणून जगू द्या ! हा गौतम बुध्द, मा.फुले, शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना स्मरुन त्यांनी आपली साहित्य निर्मिती केली आहे.

समारोपः

साहित्यामध्ये व्यक्ति स्वातंत्र्य आणि त्यांच्या समाजाचे ज्वलंत प्रश्न दलित आत्मकथनांच्या माध्यमातून आले. त्याचा परिणाम एकूण मराठी साहित्य व्यक्तीचे अनुभव आणि त्याचे भोगलेले जीवन यांच्या संदर्भात सामाजिकता. त्याचा मुख्य आशय म्हणून व्यक्त झाले.